**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन

अमरावती.

विद्यार्थी, शिक्षक तसेच संशोधकांना त्यांच्या विषयाशी संबंधित ग्रंथ सहजरित्या उपलब्ध व्हावेत व अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ग्रंथाद्वारे नवविचारांमध्ये भर पडावी, या हेतूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राद्वारे दिनांक १७ ते १९ जानेवारी, २०१९ दरम्यान ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते होणार आहे.

ग्रंथ प्रदर्शनीमध्ये क्रमिक ग्रंथासोबत विविध विषयांवरील ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षा, नेट-सेट परीक्षेला लागणारे ग्रंथ ठेवण्यात येणार आहे. ग्रंथ खरेदीबरोबरच वाचन संस्कृती जतन करण्यासाठी सदर ग्रंथ प्रदर्शनी महत्वाची असून आंतरशाखीय अभ्यासामध्ये प्राध्यान असणाऱ्या आजच्या युगात ही नक्कीच उपयुक्त पर्वणी आहे.

तरी या ग्रंथ प्रदर्शनीचा विद्यापीठातील विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, ग्रंथपाल, संशोधक, विद्यार्थी व शहरातील गणमान्य नागरिकांनी जास्तीतजास्त संख्येने लाभ घेण्याचे आवाहन ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/०१/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी